दैनिक
लोकांकीत
सत्याच्या बरोबर बातमीच्या पुढे जाणारे वृत्तपत्र
मुख्य संपादक–संजय पवार

आरोग्यमंत्री थेट जनतेशी संवाद साधणार

मुंबई–राज्यातील सार्वजनिक आरोग्य व्यवस्था अधिक सक्षम, गुणवत्तापूर्ण आणि लोकाभिमुख करण्यासाठी सार्वजनिक आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांच्या पुढाकारातून राज्यव्यापी आरोग्य संवाद यात्रा आयोजित करण्यात येत आहे. १ नोव्हेंबरला नांदेड येथून आरोग्यमंत्री यांच्या उपस्थितीत शुभारंभ होणारी ही यात्रा ५ डिसेंबर २०२६ पर्यंत चालणार आहे. या यात्रेच्या माध्यमातून आरोग्यमंत्री थेट जनतेशी संवाद साधणार असून, राज्यातील आरोग्यसेवांचा आढावा घेऊन त्यातील त्रुटी दूर करण्यावर भर दिला जाणार आहे.'माझं गाव, आरोग्यसंपन्न गाव' या अभियानाशी यात्रेची सांगड घालून सार्वजनिक स्वच्छता, शुद्ध पाणीपुरवठा, पोषण, सांडपाणी व्यवस्थापन, आजारांचे नियंत्रण आणि आरोग्यदायी जीवनशैलीबाबत जनजागृती केली जाणार आहे.

• (महाराष्ट्र) • वर्ष ९ वे • RNI : MAHMAR/2017/7448 • सोमवार दि.२ नोव्हेंबर २०२६ • अंक–१७२ • दैनिक • पाने ४ • पान १ • किंमत २ रु.

आम्ही भारतातून लोकशाहीला संपू देणार नाहीत दिल्लीच्या रामलीला मैदानात राहुल गांधी बरसले

नवी दिल्ली (वृत्तसंस्था)

इंडिया आघाडीची आज देशाची राजधानी दिल्लीतील रामलीला मैदानावर महारॅली पार पडली. निवडणूक आयोगाचे मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार आणि एसआयआर मोहीम विरोधात ही महारॅली काढण्यात आली. या रॅलीत काँग्रेस खासदार राहुल गांधी यांनी केंद्र सरकावर निशाणा साधला. आपण सर्वजण एकत्र चालत आलात. आपल्या सर्वांचे मनापासून धन्यवाद! देशाला पंतप्रधान नरेंद्र मोदी, ज्ञानेश कुमार यांना एक मेसेज पाठवायचा होता. तो मेसेज तुम्ही पाठवला आहे. हा आवाज केवळ कुठल्या एका राजकीय पक्षाचा नाही किंवा कुठल्या नेत्यांचा आवाज नाही. हा देशाच्या तरुणांचा, शेतकऱ्यांचा, मजुरांचा आवज आहे. हा आवाज सांगत आहे की, आम्ही लोकशाहीला भारतातून संपवू देणार नाही. आम्ही संविधानाला नष्ट होऊ देणार नाहीत. तुम्ही स्वत:ला कितीही मोठे समजा. तुमच्याकडे कितीही पैसे किंवा ताकद असूद्या. तुम्ही जो कुणी असाल, संविधानापेक्षा मोठे नाहीत. संविधान तुमच्यापेक्षा मोठे आहे, असं राहुल गांधी म्हणाले.अनेक वर्षांपासून या देशात व्होटचोरी होत आहे. तृणमूल काँग्रेसच्या अध्यक्षा ममता बॅनर्जी यांनी पश्चिम बंगालचं उदाहरण दिलं. मध्य प्रदेश, हरियाणा, छत्तीसगड, महाराष्ट्र, कर्नाटक आणि २०२४ ची लोकसभा, या सर्व निवडणुकांमध्ये व्होटचोरी झाली



आहे. ईव्हीएममधून व्होटचोरी झाली आहे. मतदारयांद्यांमधून लोकांचे नाव कापून व्होटचोरी झाली आहे, असा आरोप राहुल गांधी यांनी केला.२०२४ च्या निवडणुकांनंतर साडेतेरा कोटी मतदार मतदारयाद्यांमधून हटवण्यात आलं आहे. २०२४ च्या निवडणुकीनंतर १५ टक्के मतदारांना मतदारयादीमधून काढलं आहे. २०२४ च्या निवडणुकीत आपल्यात आणि एनडीएमध्ये ३ टक्के मतांचा फरक होता. त्यानंतर १५ टक्के मतदारांची नावे मतदारयादीतून वगळण्यात आली. याचा अर्थ २०२४ ची निवडणूक बेकादेशीर होती. ही गोष्ट स्वत: निवडणूक आयोग सांगत आहे. कारण त्यांनी साडेतेरा कोटी नावे मतदारयादीतून काढली आहेत. ही भारतातील प्रत्येक नागरिकाच्या हक्काची चोरी आहे. याला दुर्मिळातील दुर्मिळ गोष्ट म्हणतात. या गोष्टीला देशद्रोही म्हणतात, असं राहुल गांधी म्हणाले.

ज्ञानेश कुमार यांच्याशिवाय ना नरेंद्र मोदी पंतप्रधान बनले असते, ना अमित शाह केंद्रीय गृहमंत्री बनले असते, आरएसएसने देशाच्या सर्व संस्थांना सामावून घेतलं आहे. शिक्षण, आरोग्य, सीबीआय, ईडी, कायदा, पोलीस अशा सर्व संस्था जनतेच्या आहेत. या सर्व संस्थांवर या लोकांनी ताबा मिळवला आहे. त्यामुळे शेतकरी, तरुण, मजूर यांना आपला हक्क मिळत नाहीय. संपूर्ण धन दोन–तीन लोकांच्या हाती गेला आहे. अदानी आणि अंबानी जे स्वप्न पाहतात ते पूर्ण होतात. त्यांचे लाखो कोटींचे कर्ज क्षणार्धात माफ होतं. पण शेतकऱ्याच्या मुलाचा मुलगा, छोटा व्यावसायिक बँकेतून कर्ज घेतलं आणि त्याची परतफेड करु शकला नाही तर त्याला जेलमध्ये टाकलं जातं. असा भारत आम्हाला नकोय, असं राहुल गांधी आपल्या भाषणात म्हणाले.अमित शाह यांनी सांगितलं की नरेंद्र मोदी कुठेच जाणार नाहीत. मी आपल्याला उलट सांगतो. मी तुम्हाला सांगतो की, नरेंद्र मोदी कुठेच जाऊ शकणार नाहीत. त्यांना जायचं असेल तरी आम्ही त्यांना जाऊ देणार नाहीत. नरेंद्र मोदी, अमित शाह तुम्ही समजून जा, ज्ञानेश कुमार यांच्यानंतर आम्ही तुमच्याविरोधात उभे राहणार आहोत. आपल्या विरोधातील कारवाई होणार, असा घणाघात राहुल गांधी यांनी केला.

शेल इंडिया कंपनीतील कामगारांना दरमहा १३ हजारांची पगारवाढ

जय भारतीय जनरल कामगार संघटनेच्या यशस्वी प्रयत्नांना मोठे यश; वैद्यकीय विमा, बोनससह विविध सुविधांचा लाभ

पनवेल । प्रतिनिधी

कामगारांच्या कष्टांना योग्य मोबदला मिळावा, त्यांच्या कुटुंबांचे आर्थिक जीवनमान उंचावावे आणि त्यांना सुरक्षित व सन्मानाचे जीवन जगता यावे, या उद्देशाने कार्यरत असलेल्या जय भारतीय जनरल कामगार संघटनेने शेल इंडिया कंपनीतील सफाई कामगारांसाठी महत्त्वपूर्ण करार घडवून आणला आहे. भाजपचे महाराष्ट्र प्रदेश चिटणीस आमदार प्रशांत ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली आणि कामगार नेते जितेंद्र घरत यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या या करारामुळे कामगारांना दरमहा तब्बल १३ हजार रुपयांची पगारवाढ मिळणार आहे. यासोबतच वैद्यकीय विमा, बोनस, सणासाठी आगाऊ रक्कम आणि आपत्कालीन आर्थिक मदत अशा विविध सुविधाही उपलब्ध होणार असल्याने कामगारांसाठी हा करार आर्थिक स्थैर्य आणि सामाजिक सुरक्षिततेच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण ठरणार आहे.

आमदार प्रशांत ठाकूर यांच्या प्रमुख उपस्थितीत या कराराची प्रक्रिया पार पडली. यावेळी जय भारतीय जनरल कामगार संघटनेचे अध्यक्ष जितेंद्र घरत, शेल इंडिया कंपनीचे प्लांट मॅनेजर सचिन गुप्ता, लीडरशिप टीमचे सदस्य विनीत कश्यप, ठेकेदार आशिष मोकल, शेखर सावंत, विद्याधर पाटील तसेच कामगार प्रतिनिधी जयराम काठे, भीम शिलकर, उत्तम म्हात्रे, अविनाश गायकर आदी उपस्थित होते.तळोजा औद्योगिक क्षेत्रातील शेल इंडिया कंपनीमध्ये कार्यरत असलेल्या सफाई कामगारांच्या हिताचा विचार करून करण्यात आलेल्या या करारातून कामगारांच्या वेतनवाढीसह त्यांच्या कुटुंबांच्या आरोग्याची आणि आर्थिक गरजांचीही काळजी घेण्यात आली आहे. करारानुसार, प्रत्येक कामगाराला तीन लाख रुपयांचे वैद्यकीय विमा संरक्षण (मेडिक्लेम पॉलिसी) मिळणार आहे. सणासुदीच्या काळात आर्थिक नियोजन करता यावे, यासाठी १० हजार रुपये आगाऊ रक्कम, तर अचानक उद्भवणाऱ्या अडचणींवर मात करण्यासाठी आपत्कालीन परिस्थितीत २० हजार रुपयांपर्यंत आगाऊ आर्थिक मदत देण्यात येणार आहे. याशिवाय, पूर्ण पगाराच्या आधारे बोनस देण्याची तरतूदही करण्यात आली आहे. त्यामुळे वाढलेल्या वेतनासोबतच कामगारांना आरोग्यविषयक संरक्षण आणि गरजेच्या वेळी आर्थिक आधार मिळणार आहे.कामगारांच्या प्रश्नांना न्याय मिळवून देण्यासाठी संघटित प्रयत्न किती महत्त्वाचे असतात, याचे उदाहरण या कराराच्या माध्यमातून समोर आले आहे. कामगारांच्या मागण्यांचा सकारात्मक विचार करून त्यांच्या वेतनात भरीव वाढ आणि विविध सुविधा उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने झालेला हा करार कामगारांच्या हिताला प्राधान्य देणारा ठरला आहे. केवळ वेतनवाढीपुरता मर्यादित न राहता कामगारांच्या आरोग्याची, आर्थिक गरजांची आणि भविष्यातील सुरक्षिततेची तरतूद या करारात करण्यात आल्याने त्याचे विशेष महत्त्व आहे. कामगार हा औद्योगिक विकासाचा महत्त्वाचा घटक असून, त्याच्या श्रमाचा सन्मान आणि त्याच्या कुटुंबाचे आर्थिक स्थैर्य जपणे आवश्यक आहे. याच भूमिकेतून जय भारतीय जनरल कामगार संघटना कामगारांच्या न्याय्य मागण्यांसाठी सातत्याने प्रयत्नशील आहे. शेल इंडिया कंपनीतील कामगारांना मिळालेली ही पगारवाढ आणि विविध सुविधा म्हणजे संघटनेच्या प्रयत्नांना मिळालेले महत्त्वपूर्ण यश आहे.

माजी मुंबई अग्निशमन दल दुय्यम अधिकारी अशोक शिवतरकर यांचा सन्मान



मुंबई । प्रतिनिधी

मुंबई अग्निशमन दलाचे माजी दुय्यम अधिकारी अशोक बाबाजी शिवतरकर यांचा ६१ वाढदिवसानिमित्त त्यांचा सन्मान विक्रोळी कन्नमवार नगरातील ज्येष्ठ नागरिक प्रभात मित्र मंडळात करण्यात आला.माजी अग्निशमन अधिकारी हरिश्चंद्र गावकर यांच्या हस्ते त्यांना श्रीफळ, गुलाब पुष्प, मिठाई देऊन त्यांचा सन्मान करण्यात आला.या प्रसंगी मंडळाचे सचिव ज्येष्ठ पत्रकार नासिकेत पानसरे, मंडळाचे माजी अध्यक्ष सुरेश सरनोबत,सी.के.सर्वगौड आदींची भाषणे झाली.या कार्यक्रमास अशोक शिवतरकर यांची कन्या प्रियांका शिवतरकर उपस्थित होते.

साहित्यभूषण कवि आनंद यांच्या निवासस्थानी नीलचित्राचे अनावरण!

आमदार संजय केळकर यांच्या हस्ते लोकार्पण; आजोबांच्या स्मृतींना उजाळा देताना व्यक्त केला अभिमान

चिपळूण । सत्यवान विचारे



कोकणच्या साहित्य, सामाजिक आणि सांस्कृतिक क्षेत्रात मोलाचे योगदान देणारे साहित्यभूषण, कवी, लेखक, समाजसुधारक आणि ज्येष्ठ विधिज्ञ वि. ल. बर्वे ऊर्फ 'कवि आनंद' यांच्या निवासस्थानी त्यांच्या स्मृती जतन करण्याच्या उद्देशाने नीलचित्राची स्थापना करण्यात आली. नुकतेच या नीलचित्राचे अनावरण आमदार संजय केळकर यांच्या हस्ते समारंभपूर्वक करण्यात आले. आपल्या आजोबांच्या स्मृतींना उजाळा देणारा हा क्षण माझ्यासाठी भाग्याचा आणि आयुष्यभर स्मरणात राहणारा असल्याची भावना आमदार संजय केळकर यांनी यावेळी व्यक्त केली.

चिपळूण येथील सुमारे २०० वर्षांची ऐतिहासिक परंपरा लाभलेल्या लोकमान्य टिळक स्मारक वाचन मंदिर संस्थेच्या पुढाकारातून हा उपक्रम राबविण्यात आला. पुढील पिढ्यांना वि. ल. बर्वे यांच्या कार्याची आणि विचारांची ओळख व्हावी, त्यांच्या साहित्यिक व सामाजिक योगदानाचे स्मरण कायम राहावे, या उदात्त हेतूने त्यांच्या निवासस्थानी नीलचित्र उभारण्यात आले.

यावेळी वाचन मंदिराच्या संचालकांनी आपल्या मनोगतात या उपक्रमामागील संकल्पना स्पष्ट करताना वि. ल. बर्वे यांच्या जीवनातील अनेक आठवणींना उजाळा दिला. साहित्य क्षेत्राबरोबरच सामाजिक परिवर्तनाच्या चळवळीतही त्यांनी दिलेले योगदान अधोरेखित केले.

विशेष म्हणजे, त्या काळातील अस्पृश्यतेच्या रूढींना धक्का देत वि. ल. बर्वे यांनी महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या उपस्थितीत स्पृश्य-अस्पृश्य समाजबांधवांचा सहभोजनाचा कार्यक्रम आयोजित केला होता. सामाजिक समतेच्या दिशेने टाकलेले हे क्रांतिकारी पाऊल होते. या ऐतिहासिक घटनेचा उल्लेख स्वतः भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी 'बहिष्कृत भारत' या ग्रंथात केल्याचेही यावेळी सांगण्यात आले.आपले आजोबा वि. ल. बर्वे ऊर्फ कवि आनंद यांच्या विचारांचा वारसा लाभणे हे आपले भाग्य असल्याचे सांगताना आमदार संजय केळकर म्हणाले की, समता, सामाजिक समरसता आणि सामाजिक न्यायाचे संस्कार आपल्याला त्यांच्याकडूनच मिळाले. चिपळूणमध्ये त्यांच्या स्मृती जतन करण्यासाठी असा उपक्रम सुरू झाल्याचा मनस्वी आनंद आहे.इतिहास केवळ पुस्तकांमध्ये न राहता तो पुढील पिढ्यांसमोर जिवंत राहावा, या दृष्टीने लोकमान्य टिळक स्मारक वाचन मंदिराने उचललेले हे पाऊल निश्चितच कौतुकास्पद आहे. या उपक्रमाबद्दल आमदार संजय केळकर यांनी संस्थेचे अभिनंदन केले.

उरण बायपास रस्त्यासाठी केलेल्या संघर्षाची अखेर फलश्रुती

गोपाळराव पाटील यांचा भव्य नागरी सत्कार सोहळा उत्साहात संपन्न

विविध मान्यवरांची उपस्थिती; सामाजिक आणि विकासकामांतील योगदानाचा गौरव

उरण । विठ्ठल ममताबादे



उरणच्या नागरिकांना भेडसावणाऱ्या प्रश्नावर मार्ग काढण्यासाठी तसेच उरण शहरात होणाऱ्या वाहतूक कोंडीवर उपाय योजना करताना उरण ते मोरा या मार्गावर बायपास रस्त्याची संकल्पना सुचली. या बायपास साठी अनेक संघर्ष केला. आज ते पूर्णत्वास आले. अजूनही पुढे काम करायचे आहे. बायपास रस्त्याचे खरे श्रेय मंत्री सुनील तटकरे,सिडकोचे तत्कालीन अध्यक्ष नकुल पाटील, सिडकोचे अध्यक्ष प्रमोद हिंदुराव यांना आहे. त्यांच्यामुळेच हे बायपास रस्त्याचे काम झाले आहे. या मध्ये पत्रकारांचा खूप मोठा वाटा आहे. पत्रकारांनी शेवटपर्यंत हा मुद्दा उचलून धरून पूर्णत्वास नेला. त्यांचीही भूमिका महत्वाची राहिली आहे असे सांगत सामाजिक कार्यकर्ते गोपाळ पाटील यांनी ज्यांनी ज्यांनी बायपास रस्त्यासाठी योगदान दिले त्या सर्वांचे योगदाना बद्दल गौरवोदगार काढले.उरण बायपास रस्त्याच्या निर्मितीसाठी अनेक वर्षे सातत्याने संघर्ष, पाठपुरावा आणि प्रयत्न करणारे सामाजिक कार्यकर्ते गोपाळराव पाटील यांच्या कार्याचा गौरव करण्यासाठी आयोजित करण्यात आलेला भव्य नागरी सत्कार सोहळा उरण बायपास रोड, कोटनाका येथे मोठ्या उत्साहात संपन्न झाला. या प्रसंगी गोपाळ पाटील यांनी आपल्या मनोगत व्यक्त केले.या सोहळ्याला विविध क्षेत्रांतील मान्यवर, सामाजिक कार्यकर्ते, पदाधिकारी आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.उरण बायपास रस्त्याचे काम २०१८ च्या पूर्वीचे आहे.विविध पाठपुरावा यासाठी करावा लागला. चांगले काम करणाऱ्यांच्या पाठीशी सर्वांनी उभे रहा.असे आवाहनही गोपाळ पाटील यांनी केले यावेळी त्यांनी उरण बायपास रस्त्याचा ईतिहास सांगितला.या कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून उरण नगरपरिषदेच्या नगराध्यक्षा श्रीमती भावनाताई घाणेकर आणि उरण पंचायत समितीचे सभापती महेश म्हात्रे उपस्थित होते. त्यांच्या हस्ते गोपाळराव पाटील यांचा सन्मान करण्यात आला.यावेळी व्यासपीठावर नगराध्यक्ष भावना घाणेकर,पंचायत समितीचे सभापती महेश म्हात्रे,ऍड विजय पाटील,सामाजिक कार्यकर्ते गोपाळ पाटील यांच्या पत्नी रेश्मा पाटील,कॉम्रेड भूषण पाटील, सामाजिक कार्यकर्ते संतोष पवार, चेस असोसिएशन अध्यक्ष संदीप पाटील,उरण सामाजिक संस्थेचे अध्यक्ष सुधाकर पाटील, शिक्षक नेते दा.चा. कडू,सामाजिक कार्यकर्ते तथा जेष्ठ साहित्यिक एल बी पाटील,कामगार नेते रवि घरत,नगरसेविका प्रमिला पवार,माजी सरपंच मानसी पाटील,महिला सामाजिक कार्यकर्त्या हेमलता पाटील आदी मान्यवर उपस्थित होते.यावेळी उपस्थित मान्यवरांनी त्यांच्या सामाजिक कार्याचे आणि उरण परिसराच्या विकासासाठी केलेल्या योगदानाचे कौतुक केले.भावना घाणेकर, भूषण पाटील, विजय पाटील, महेश म्हात्रे, संतोष पवार आदी मान्यवरांनी गोपाळ पाटील यांच्या आजपर्यंतच्या कार्याचे उल्लेख करत बायपास रस्त्याचा इतिहास उलगडून सांगितला.व गोपाळ पाटील यांच्या कार्याचे कौतुक करत पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.उरण बायपास रस्त्याचा प्रश्न मार्गी लावण्यासाठी गोपाळराव पाटील यांनी गेल्या अनेक वर्षांपासून सातत्याने प्रयत्न केले. २००८ मध्ये तत्कालीन पालकमंत्री सुनील तटकरे, सिडकोचे तत्कालीन अध्यक्ष नकुल पाटील तसेच संबंधित लोकप्रतिनिधींकडे त्यांनी लेखी मागणी करून पाठपुरावा सुरू केला होता. त्यानंतर २०१० मध्ये सिडकोकडून सुमारे २८ कोटी रुपयांची तरतूद मंजूर होऊनही काही कारणांमुळे काम रखडले. २०१६ मध्ये पुन्हा पाठपुरावा करत उपोषण आणि नोटिसांच्या माध्यमातून प्रश्नाला वाचा फोडण्यात आली. २०१८ मध्ये या कामासाठी ४२ ते ४५ कोटी रुपयांची किंमत निश्चित झाल्यानंतरही काम पूर्णत्वास नेण्यासाठी त्यांनी प्रयत्न सुरूच ठेवले. अखेर २०२६ मध्ये सातत्यपूर्ण पाठपुराव्याला यश मिळून पुलाचे काम पूर्ण झाले आणि तो जनतेच्या सेवेसाठी उपलब्ध झाला.या प्रवासात आलेल्या अडचणी, संघर्ष आणि सातत्यपूर्ण प्रयत्नांचा आढावा यावेळी घेण्यात आला. एखाद्या सार्वजनिक विकासकामासाठी जिद्द, चिकाटी आणि लोकहिताची भावना किती महत्त्वाची असते, याचे उदाहरण गोपाळराव पाटील यांच्या कार्यातून समोर आल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली.या नागरी सत्कार सोहळ्याचे आयोजन उरण सामाजिक संस्था – सुधाकर पाटील (माजी आय आर एस), आधार सावली फाउंडेशन – रेश्मा म्हात्रे, उरण उत्कर्ष समिती – दीपक गावंड, युवा सामाजिक संस्था व जासखार अध्यक्ष हर्षल ठाकूर तसेच उरण तालुका चेस असोसिएशनचे अध्यक्ष संदीप पाटील यांच्या वतीने करण्यात आले होते.सदर कार्यक्रमाचे सुंदर असे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन सामाजिक कार्यकर्ते संतोष पवार यांनी केले.या सोहळ्यामुळे उरणच्या विकासासाठी योगदान देणाऱ्या व्यक्तींच्या कार्याचा गौरव करण्याबरोबरच सामाजिक बांधिलकी आणि लोकहिताच्या कामांना प्रोत्साहन देणारा सकारात्मक संदेश नागरिकांमध्ये पोहोचला. उपस्थित नागरिकांनी गोपाळराव पाटील यांचे अभिनंदन करून पुढील सामाजिक वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

वांद्रे पोलीस ठाण्यात सरदार वल्लभभाई पटेल जयंती साजरी

मुंबई । प्रतिनिधी



वांद्रे पोलीस ठाण्यात (पश्चिम) ३१/१०/२०२६ रोजी लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेल यांच्या १५१ व्या जयंतीनिमित्त गुजरातमधील एकता परेड चे थेट प्रक्षेपण आयोजित केले. या कार्यक्रमाला सेंट स्टॅनिस्लॉस हायस्कूलचे एनसीसी, स्काऊट्स, आरएसपी केडर्स आणि फादर ग्रेल हायस्कूल, वांद्रे येथील एनओएसएसचे विद्यार्थी, शिक्षक तसेच वांद्रे पोलीस मोहल्ला समितीचे सदस्य उपस्थित होते. उपस्थित असलेल्या सर्वांनी भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यासोबत थेट प्रक्षेपणाद्वारे राष्ट्रीय एकतेची शपथ घेतली.वरिष्ठ पोलीस निरीक्षक रवींद्र साळुंके, जनसंपर्क अधिकारी पोलीस निरीक्षक सचिन राणे यांच्या नेतृत्वाखाली हवालदार मुलिक, पोलीस कॉन्स्टेबल आर. खोमाणे आणि पोलीस कॉन्स्टेबल व्ही. शिंदे यांच्या सहकार्याने हा कार्यक्रम उत्तमरित्या आयोजित करण्यात आला होता.

सार्वजनिक ठिकाणी छटपूजेला बंदी घाला–मराठी एकीकरण समिती

संतोष पडवळ । ठाणे

गणेश विसर्जनाप्रमाणेच चौपाट्या, तलाव, नद्या आणि अन्य सार्वजनिक जलस्रोतांच्या ठिकाणी छटपूजा साजरी करण्यास बंदी घालण्यात यावी, अशी मागणी मराठी एकीकरण समितीने पोलीस व महापालिका प्रशासनाकडे केली आहे. महाराष्ट्राच्या सांस्कृतिक परंपरेशी संबंध नसलेल्या या उत्सवासाठी सार्वजनिक ठिकाणी परवानगी देऊ नये, अशी भूमिका समितीने निवेदनाद्वारे मांडली आहे. गेल्या काही वर्षांत महाराष्ट्रात छटपूजेचे आयोजन मोठ्या प्रमाणावर होत असल्याचे समितीने निदर्शनास आणून दिले आहे. यंदा १३ ते १६ नोव्हेंबर २०२६ या कालावधीत छटपूजा साजरी होणार आहे. या निमित्ताने नदी, तलाव



आणि समुद्रकिनाऱ्यांवर मोठ्या प्रमाणात नागरिक एकत्र येऊन धार्मिक विधी करतात. त्यामुळे सार्वजनिक जलस्रोतांमध्ये पूजेचे साहित्य, निर्माल्य, फळे, प्लास्टिक आणि अन्य कचरा टाकला जाण्याची शक्यता असून जलप्रदूषण व अस्वच्छतेचा प्रश्न निर्माण होतो, असे समितीचे म्हणणे आहे.

गणेशोत्सव काळात चौपाट्या व तलावांमध्ये विसर्जनावर निर्बंध घालून अनेक ठिकाणी कृत्रिम विसर्जन कुंडांची व्यवस्था करण्यात आली होती. त्याच धर्तीवर छटपूजेसाठीही सार्वजनिक जलस्रोतांवर परवानगी देऊ नये, अशी मागणी समितीने केली आहे. दरम्यान, छटपूजेचे धार्मिक विधी करण्यासाठी संबंधित नागरिकांना त्यांच्या वैयक्तिक खर्चाने खासगी जागांमध्ये तात्पुरत्या पोर्टेबल पाण्याच्या टाक्यांची व्यवस्था करण्याची मुभा द्यावी, अशी पर्यायी सूचनाही मराठी एकीकरण समितीने शासन आणि प्रशासनाकडे केली आहे. त्यामुळे सार्वजनिक जलस्रोतांचे प्रदूषण रोखण्यास मदत होईल, अशी भूमिका समितीने मांडली आहे.

सिद्धी महिला कल्याणकारी संस्थेचा स्तुत्य उपक्रम तृतीयपंथीयांना दिवाळी भेट व धान्य किटचे वाटप

मुंबई । प्रतिनिधी

दिवाळी सणाचे औचित्य साधून सिद्धी महिला कल्याणकारी संस्थेच्या वतीने तृतीयपंथीय बांधव-भगिनींसाठी दिवाळी आनंदोत्सव आणि मदतीचा उपक्रम आयोजित करण्यात आला. या उपक्रमातून सामाजिक बांधिलकी, माणुसकी आणि सर्वसमावेशकतेचा संदेश देण्यात आला.शुक्रवार, दिनांक ३० ऑक्टोबर २०२६ रोजी भांडुप येथे राहुल आर्ट यांच्या सहकार्याने तृतीयपंथीय बांधव-भगिनींना दिवाळी भेटवस्तूंचे वाटप करण्यात आले. यावेळी उपस्थितांनी आपापल्या कलागुणांचे सादरीकरण करून कार्यक्रमात उत्साहाची भर घातली. या कार्यक्रमाला अनिरुद्ध ओव्हाळ समितीच्या उपाध्यक्षा जयश्री ओव्हाळ ताई यांची प्रमुख उपस्थिती होती.तसेच शनिवार, दिनांक ३१ ऑक्टोबर २०२६ रोजी कांजूरमार्ग येथे स्मिता कवडे यांच्या हस्ते तृतीयपंथीय बांधव-भगिनींना धान्याच्या किटचे वाटप करण्यात आले. या दोन्ही



उपक्रमांमध्ये एकूण ५० तृतीयपंथीय बांधव-भगिनी सहभागी झाले होते. सर्वांनी एकत्र येत दिवाळीचा आनंद साजरा केला.

समाजातील प्रत्येक घटकाला सण-उत्सवाचा आनंद घेता यावा, त्यांनाही आपलेपणाची जाणीव व्हावी आणि त्यांचा सन्मान राखला जावा, या उद्देशाने सिद्धी महिला कल्याणकारी संस्थेने हा उपक्रम राबविला. संस्थेच्या या सामाजिक कार्याचे उपस्थितांकडून कौतुक करण्यात आले.माणुसकीचा दिवा प्रत्येकाच्या आयुष्यात उजळावा, हाच या उपक्रमामागील खरा संदेश ठरला.

जागतिक स्ट्रोक दिन: तंबाखूवरील अवलंबित्वाला आळा आवश्यक

नवी मुंबई । प्रतिनिधी

भारतात स्ट्रोक आणि हृदयविकारांचे मोठे ओझे कायम असून, त्यामुळे बदल करता येण्याजोग्या जोखीम घटकांच्या प्रतिबंधाला सार्वजनिक आरोग्याच्या दृष्टीने प्राधान्य मिळाले आहे. तंबाखूचे सेवन हे या ओझ्याला कारणीभूत ठरणारे एक प्रमुख आणि टाळता येण्याजोगे कारण आहे.

२०२४ मध्ये ग्लोबल बर्डन ऑफ डिसीज डेटाच्या विश्लेषणानुसार, भारतातील स्ट्रोकमुळे होणाऱ्या मृत्यूंपैकी १२% मृत्यूंना तंबाखूचे सेवन कारणीभूत असल्याचा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे, तर उच्च सिस्टोलिक रक्तदाब ५६% प्रकरणांसाठी जबाबदार असल्याचे आढळले. हे निष्कर्ष स्ट्रोक आणि हृदयविकार टाळण्यासाठी व्यापक धोरणाचा भाग म्हणून इतर जोखीम घटकांसोबतच तंबाखूच्या सेवनावरही लक्ष केंद्रित करण्याची आवश्यकता अधोरेखित करतात.

मेदांता सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल, नोएडा येथील न्यूरोसर्जरी आणि न्यूरोसायन्सेस विभागाचे संचालक डॉ. यशपाल सिंह बुंदेला, आरोग्यावरील धोके



माहिती असूनही निकोटीनवरील अवलंबित्वामुळे तंबाखू सोडणे कठीण ठरू शकते. सी. के. बिर्ला हॉस्पिटल, पंजाबी बाग येथील श्वसनरोग विभागाचे संचालक डॉ. विकास मित्तल, सार्वजनिक आरोग्य सुधारण्यासाठी आपण तंबाखू नियंत्रणाच्या पारंपरिक उपाययोजनांच्या पलीकडे पाहिले पाहिजे आणि तंबाखूचे सेवन कमी करण्यात प्रगती साधलेल्या देशांच्या अनुभवांतून शिकले पाहिजे. जागतिक आरोग्य संघटना (WHO) च्या अंदाजानुसार, भारतात दरवर्षी जवळपास १३.५ लाख मृत्यूंसाठी तंबाखूचे सेवन कारणीभूत असते.

आ.प्रशांत ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा परिषद सदस्या कमळा एकनाथ देशेकर यांच्या प्रयत्नातून विविध विकास कामाचे भूमिपूजन

पनवेल । प्रतिनिधी

पनवेलचे आमदार प्रशांत ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली आणि जिल्हा जिल्हापरिषद सदस्य कमळा एकनाथ देशेकर यांच्या प्रयत्नातून अनेक विविध विकास कामाचे भूमिपूजन आमदार प्रशांत ठाकूर यांच्या शुभहस्ते करण्यात आले. यावेळी रायगड जिल्हा परिषदेचे अध्यक्ष मंगेश वाकडीकर, भाजप उत्तर जिल्हा अध्यक्ष अविनाश कोळी, भाजपचे जेष्ठ नेते अरुणशेठ भगत पंचायत समिती उपसभापती भूपेंद्र पाटील, माजी जिल्हा परिषद सदस्य उधोगपती एकनाथ देशेकर यांच्या सह मोठया संख्येने कार्यकर्ते, ग्रामस्थ उपस्थित होते

जिल्हा परिषद सदस्या कमळा एकनाथ देशेकर या समाजसेवेने झपाटलेल्या आहेत. यांनी चिंध्रण



ग्रामपंचायतच्या सरपंच असताना शासनाच्या योजनांचा लाभ घेता यावा. महिलांना आपल्या पायावर उभे राहता यावे म्हणून स्वखर्चातून महिलांचे बचत गट तयार केले. या बचत गटाच्या माध्यमातून परिसरातील महिलांसाठी अनेक स्वयंरोजगाराच्या योजना सुरू केल्या आहेत त्यांनी हजारो महिलांना स्वतःच्या पायावर उभे केले आहेत . आणि करत आहेत. आपण ज्या गरिबीतून आलो आहेत याची जाणीव ठेवत माझ्या सारखी माझ्या कोणत्याही भगिनीवर वेळ येऊ नये त्यानी स्वतःच्या पायावर उभे राहावे आपले घर स्वतःच चालवावे यासाठी त्यानी अनेक स्वयंरोजगाराच्या योजना सुरु केल्या आहेत. आणि त्यासाठी त्या जातीने लक्ष देत आहेत. यामागे त्यांचे पती एकनाथ देशेकर यांचे मोलाचे सहकार्य लाभत आहे. त्यांनी जिल्हा परिषद सदस्य होताच आपल्या जिल्हा परिषद गटाचा विकास करण्यासाठी प्रयत्न सुरु केले आहेत. खानाव येथे अंतर्गत रस्ता करणे

१० लाख रुपये,खानाव येथे स्मशानभूमी निवारा शेड १०, लाख, मोर्बे येथे पाईपलाईन नळ योजना८ लाख, चिंचवली तर्फे तलोजा ते शिरवली तर्फे तलोजा रस्ता काँक्रीटीकरण

५ कोटी ६३ लाख,चिंध्रण येथे रस्ता करणे१० लाख,

वांवजेकडे मुख्य रस्ता काँक्रीटीकरण करणे वावंजे हॉस्पिटल रस्ता २ कोटी,वावंजे ते मानपाडा रोड कॉक्रीटीकरण राईस मिल२.३० लाख,नितळस येथे नवीन शाळा बांधणे२५ लाख,

या विविध कामाचे उद्घाटन आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते झाले. रायगड जिल्ह्यात पायाभूत सुविधांचे मोठे जाळे उभे राहणार आहे. विकासकामांसाठी केंद्र व राज्य सरकार कडून भक्कम पाठबळ मिळतं आहे. विकासकामांसाठी निधी कमी पडू दिला जाणार नाही असे आमदार प्रशांत ठाकूर यांनी सांगितले.

आगरी समाजाच्या उन्नतीसाठी मी खंबीरपणे पाठीशी-महेंद्रशेठ घरत

तरुण-तरुणींनो आई वडिलांची सेवा करा-महेंद्रशेठ घरत

उलवे । प्रतिनिधी

आजघडीला आगरी समाजात उच्च शिक्षणाचे प्रमाण खूप वाढले आहे. मात्र योग्य वयात लग्न न झाल्याने पुढे अनेक प्रश्न निर्माण होतात. त्यासाठी वधू-वर मेळावे आयोजित करून लग्न जमविण्यासाठी सुरू असलेले प्रयत्न कौतुकास्पद आहेत. त्यासाठी मुंबईच्या आगरी विकास संघाचे योगदान महत्त्वाचे आहे. इतर समाजाच्या मानाने आगरी समाज एकसंघ नाही, तो विखुरला गेला आहे. वडिलोपार्जित जमिनीच्या माध्यमातून काहींना खूप पैसे मिळाले, पण बहिर्णींना वाटा देताना हात आखडता घेतला. त्यामुळे अनेक ठिकाणी भाऊ-बहिर्णींच्या नात्यात दुरावा निर्माण झाला, हे वास्तव आहे. मी मात्र भाऊ- बहिर्णींना सारखा वाटा दिला. त्यामुळे मी सुखी आहे. आपला आगरी समाज भोळाभाभडा आहे. त्यामुळे आगरी समाजाच्या उन्नतीसाठी मी खंबीरपणे पाठीशी आहे'



असे आंतरराष्ट्रीय कामगार नेते महेंद्रशेठ घरत वाशी येथे रविवारी (ता.१) बोलताना म्हणाले. वाशी येथे आगरी समाजाचा वधु-वर मेळावा आयोजित करण्यात आला होता. त्यावेळी बोलताना ते पुढे म्हणाले, तरुण-तरुणींनो आयुष्यात आई-वडिलांचा सन्मान करा, त्यांची शेवटपर्यंत सेवा करा. नोकरी पाहिजे असेल तर मी आपल्या मागे आहेच. वेळेचा सदुपयोग करा, देव माणसात पाहा, दुसऱ्याला देण्याच्या भूमिकेतून जगा, आयुष्यभर तुम्हाला काही पडणार नाही, हे मी स्वानुभवातून सांगतोय. लग्नानंतर तडजोड स्वीकारली तर आयुष्य सुवर्णमय होईल.

यावेळी आगरी समाज विकास संघाच्या वतीने महेंद्रशेठ घरत यांचा यथोचित सन्मान करण्यात आला. त्यावेळी आगरी समाज विकास संघाचे राजेंद्र मोकल म्हणाले, महेंद्रशेठ घरत यांनी आगरी समाजाचे नाव सातासमुद्रापार नेले आहे. याचा आम्हाला सार्थ अभिमान आहे. त्यांच्या दरोजच्या जनता दरबारात शेकडोंना आधार मिळत आहे. त्यामुळे आगरी समाजाचे ते वैभव आहेत.

यावेळी पेण, अलिबाग, पनवेल, उरण, ठाणे, मुंबई येथील आगरी तरुण-तरुणी आणि त्यांचे आई-वडील उपस्थित होते. यावेळी मुंबईच्या आगरी विकास संघाचे राजेंद्र मोकल, बिपीन पाटील आणि पदाधिकारी उपस्थित होते. त्यांनी मेळाव्याचे उत्तम आयोजन केले होते.

एलआयसी-मुंबई मेयर कप शालेय बुद्धिबळ स्पर्धा

मुंबई । प्रतिनिधी

प्रतिष्ठित एलआयसी-मुंबई मेयर कप शालेय बुद्धिबळ स्पर्धेत, युवा बुद्धिबळपटू एरिक पिकार्डो ६ वर्षांखालील वयोगटात विजेता ठरला. त्याने संपूर्ण विभागातील प्रतिभावान युवा बुद्धिबळपटूंशी स्पर्धा करून एक अभिमानास्पद यश मिळवले आहे.

ही स्पर्धा आयडियल स्पोर्ट्स अकादमी आणि आनंदराव अडसूळ चॅरिटेबल ट्रस्ट यांनी आयोजित केली होती, तर भारतीय आयुर्विमा महामंडळ (एलआयसी) सह-प्रायोजक होते. या फिडे-मानांकित शालेय बुद्धिबळ स्पर्धेत २५१ युवा खेळाडूंनी भाग घेतला होता, ज्यात विविध वयोगटांचे प्रतिनिधित्व करणारे अनेक आंतरराष्ट्रीय फिडे-मानांकित कनिष्ठ बुद्धिबळपटूंचा समावेश होता.एरिकने ६ वर्षांखालील गटात प्रभावी कामगिरी करत ५ गुणांसह प्रथम स्थान पटकावले. त्याच्या या कामगिरीची स्पर्धेच्या वयोगटानुसार



निकालांमध्ये नोंद झाली, ज्यातून युवा बुद्धिबळपटूंची स्पर्धात्मक वृत्ती आणि उदयोन्मुख प्रतिभा दिसून आली. या चॅम्पियनशिपमध्ये आंतरराष्ट्रीय FIDE मानांकन असलेल्या खेळाडू आरहत वाघमारेने १३ वर्षांखालील आणि १४ वर्षांखालील विजेतेपद पटकावून एक उल्लेखनीय दुहेरी विजयही मिळवला. तो १३ वर्षांखालील गटात अजिंक्य राहिला आणि एका अटीतटीच्या लढतीनंतर ६.५ गुणांसह १४ वर्षांखालील गटाचे विजेतेपद मिळवले.एरिक पिकार्डोसाठी, २५१ स्पर्धक असलेल्या या स्पर्धेत ६ वर्षांखालील गटाचे विजेतेपद मिळवणे, हा त्याच्या उदयोन्मुख बुद्धिबळ प्रवासातील एक महत्त्वाचा टप्पा आहे. त्याचे हे यश, मुलांना लहान वयातच बुद्धिबळासारख्या बौद्धिक खेळांची ओळख करून देण्याचे महत्त्व अधोरेखित करते.

एरिक पिकार्डो आणि आरहत वाघमारे यांना उपमुख्यमंत्री श्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते सन्मानित करून पुरस्कारही प्रदान करण्यात आला, ज्यामुळे हा प्रसंग या तरुण बुद्धिबळप्रेमीसाठी विशेष संस्मरणीय ठरला.८ वर्षांखालील गटाचे विजेतेपद ५ गुणांसह अजिंक्य राहिलेल्या साध्या जाधवने पटकावले. अरिंजय भट्टाचार्जीने दुसरे स्थान, तर एकम बागलाने तिसरे स्थान मिळवले; या दोघांनीही ४ गुणांसह स्पर्धेचा शेवट केला. ८ वर्षांखालील गटात, इथन पिकार्डोने आपल्या ५ पैकी ४ सामने जिंकून प्रभावी कामगिरी केली आणि ४ गुणांसह चौथे स्थान पटकावले. त्याने अनेक आश्वासक तरुण बुद्धिबळपटूंशी स्पर्धा केली.या चॅम्पियनशिपमध्ये विविध वयोगटांतील तरुण बुद्धिबळप्रेमींनी सहभाग घेतला होता, आणि उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्यांना चषक, भेटवस्तू व बक्षिसे देण्यात आली. बक्षीस वितरण समारंभाला महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री श्री एकनाथ शिंदे हे देखील उपस्थित होते, ज्यांनी तरुण कर्तृत्ववान खेळाडूंचा सत्कार केला.

ठाण्यात राज्यस्तरीय शालेय मल्लखांब स्पर्धेचा थाटात शुभारंभ जिल्हाधिकारी डॉ.श्रीकृष्ण पांचाळ यांच्या हस्ते उद्घाटन

संतोष पडवळ । ठाणे

क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या अंतर्गत जिल्हा क्रीडा परिषद आणि जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, ठाणे यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित राज्यस्तरीय शालेय मल्लखांब स्पर्धा २०२६-२७ चा उद्घाटन सोहळा उत्साहात पार पडला. १४, १७ आणि १९ वर्षांखालील वयोगटांसाठी आयोजित या स्पर्धेचे उद्घाटन जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ आणि महाराष्ट्र राज्य हौशी मल्लखांब संघटनेचे कार्याध्यक्ष उत्तमराव लटपटे यांच्या हस्ते करण्यात आले.या कार्यक्रमाला पॅरा आशियाई क्रीडा स्पर्धेतील १०० मीटर धावण्याच्या स्पर्धेत कांस्यपदक विजेते प्रणव देसाई, त्यांचे प्रशिक्षक निलेश पाटकर,



मल्लखांबमधील अर्जुन पुरस्कार विजेत्या हिमानी परब, ठाणे जिल्हा थलेटिक्स संघटनेचे सचिव अशोक अहिर, तहसीलदार सुजाता शिंदे, ठाणे जिल्हा मल्लखांब संघटनेच्या अध्यक्षा मंगला करंदीकर आणि जिल्हा क्रीडा अधिकारी सुवर्णा बारटक्के यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित होते.

दरम्यान, स्पर्धेत सहभागी खेळाडूंचा उत्साह वाढवण्यासाठी खासदार नरेश म्हस्के, ठाण्याच्या महापौर शर्मिला पिंपळोलकर आणि विधान परिषद सदस्य निरंजन डावखरे यांनी क्रीडांगणाला सदिच्छा भेट दिली. यावेळी त्यांनी खेळाडूंशी संवाद साधत त्यांना स्पर्धेसाठी आणि पुढील क्रीडा वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांच्या विशेष संकल्पनेतून खेळाडूंना प्रोत्साहन देण्यासाठी विशेष उपक्रम राबविण्यात येत आहे. त्यानुसार स्पर्धेत सहभागी होणाऱ्या प्रत्येक खेळाडूला क्रीडा बॅग भेट देण्यात येणार असून, उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या विजेत्या खेळाडूंना स्मार्ट वॉच देऊन गौरविण्यात येणार आहे. या उपक्रमामुळे राज्यभरातून सहभागी झालेल्या युवा मल्लखांबपटूंमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे.

दैनिक लोकांकीत हे वृत्तपत्र मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक संजय त्रिंबक पवार यांनी पार्थ प्रिंटिंग प्रेस, कर्नाळा भवन, ४५/६१, सहकारी भात गिरणी कंपाऊंड मार्केट यार्ड, पनवेल, जि. रायगड पिन ४१०२०६ येथे छापून मुख्य कार्यालय,शॉप नं.१२४, दत्त मंदिर चाळ, कोंकण नगर, नवजिवन सोसा. समोर, रामकृष्ण चेंबूरकर मार्ग, चेंबूर, मुंबई पिन.७८ पनवेल कार्यालय,साई शरण को-ऑप. ही. सोसायटी, प्लॉट नं. ५०, ऑफीस नं. १४, सेक्टर ८, खांदा कॉलनी, नवीन पनवेल ४१० २०६ येथून प्रकाशित केले. मो. ९३२१५८५३६५